# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सर्वसाधारण सभा दि १७/१०/२०२३

## कार्यवृत्त

आज दि १७/१०/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम विभाग व नियोजन विभाग व शिक्षण विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| | **बांधकाम विभाग** |
| १ | नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण साठी राखीव ५% तरतुदी मधून अंगणवाडी साठी सोयी सुविधा उपलब्ध करून देणे बाबत. |
| | **नियोजन विभाग** |
| २ | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३० (१) अन्वये मलकापूर शहराच्या प्रारुप विकास योजना (मुळ हद्द दुसरी सुधारित) शासनास मंजुरीस्तव सादर करण्यास मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करणेबाबत मंजूरी देणे |
| ३ | तहसिल चौकात भारतीय घटनेचे शिल्पकार व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रवेश द्वाराची निर्मिती आणि रेल्वे स्टेशन समोर जुना नाका येथे ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजय स्तंभाची प्रतिकृती निर्मितीबाबत ना हरकत ठराव देणे. |
| | **शिक्षण विभाग** |
| ४ | श्री डी.एस. राठोड यांना मुख्याध्यापक प्राचार्य या पदाचा पूर्णवेळ कार्यभार मिळणे बाबत. |
| ५ | न.प. मलकापूर द्वारा संचालित म्युनिसिपल हायर सेकंडरी स्कूल मलकापूर मधील श्री के.जी. साखरे यांच्या अर्जित रजा रोखीकरण करिता मंजुरी मिळणे बाबत |

**विषय क्र १:- नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण साठी राखीव ५% तरतुदी मधून अंगणवाडी साठी सोयी सुविधा उपलब्ध करून देणे बाबत.**

नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण साठी राखीव ५% तरतुदी मधून अंगणवाडी साठी सोयी सुविधा उपलब्ध करून देणे बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, नगर अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) बुलढाणा यांचे पत्र क्र बाविप्रअ / अ.क्र. / ना. प्र. / बुल / न.पा. निधी / २३-२४ दि ०१/०८/२०२३ नुसार नगरपरिषद कार्यक्षेत्रातील अंगणवाड्यांकारिता सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण साठी राखीव ५% तरतुदीमधून अंगणवाडी साठी सोयी सुविधा उपलब्ध करून देणेबाबत पत्रात नमूद केले आहे. त्यामध्ये रुपये १ /- दरमहा नाममात्र भाडेतत्वावर अंगणवाडी साठी इमारत उपलब्ध करून देणे तसेच घ्यावे लागणारे साहित्य नमूद केले आहे, पिण्याच्या पाण्याची व शौचालयाची व्यवस्था, गरोदर महिला - अंगणवाडी विध्यार्थी वैद्यकीय तपासणी, वजनमापे इत्यादी नमूद आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता इमारती संबंधी विकास कामे बांधकाम विभागाशी संबंधित असून सदर विकास कामे व संबंधित उपाय योजना करण्याच्या कार्यवाहीस व त्यास येणारा खर्च नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण साठी राखीव ५% तरतुदीमधून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र २ :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३० (१) अन्वये मलकापूर शहराच्या प्रारुप विकास योजना (मुळ हद्द दुसरी सुधारित) शासनास मंजुरीस्तव सादर करण्यास मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करणेबाबत मंजूरी देणे**

मा.सहायक संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग बुलढाणा यांनी दि. १०/१०/२०२३ रोजी दिलेल्या पत्रानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३० (१) अन्वये मलकापूर शहराच्या प्रारुप विकास योजना (मुळ हद्द दुसरी सुधारित) शासनास मंजुरीस्तव सादर करण्यास मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करणेबाबत सूचित करण्यात आलेले होते त्यानुषंगाने आजच्या सभेत सविस्तर विचार विनिमय करण्यात आला.

मलकापूर नगर परिषदची प्रारूप विकास योजना (मुळ हद्द दुसरी सुधारित) सर्व साधारण सभेने ठराव क्र.०१ दि.०६/१२/२०२२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम २६ (१) मधील तरतुदीनुसार प्रसिद्ध करण्यास मान्यता दिलेली आहे.त्यानुसार दि. ०२/०१/२०२३ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

अधिनियमातील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध केल्यानंतर अधिनियमातील कलम ३० अन्वये शासनास मंजुरीस्तव सादर करण्यासाठी मुळ मुदत ६ महिने, म्हणजेच दि.०१/०७/२०२३ पावतो होती.

तथापी, खालील नमूद कारणांमुळे सदरच्या मुळ मुदतीत प्रारूप विकास योजना शासनास मंजुरीस्तव सादर करणे शक्य होणार नाही.

१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम २८ नुसार गठीत नियोजन समितीस प्राप्त सूचना व हरकती यांवर सुनावणी घेऊन अहवाल सादर करणेकरिता लागलेला अधिकचा कालावधी.

त्यामुळे, प्रारूप विकास योजना शासनास मंजुरीस्तव सादर करण्यासाठी दि.३१/१०/२०२३ इतका कालावधी लागण्याची शक्यता आहे. सबब,अधिनियमातील कलम ३० मधील तरतुदीनुसार दि.०१/०७/२०२३ ते दि.३१/१०/२०२३ पावेतोचा मुदत वाढीचा प्रस्ताव, मा.सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती, यांच्याकडे सादर करणेस हि सभा मंजुरीदेत असून, याबाबत मुख्याधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

त्यानुषंगाने मुख्याधिकारी, नगर परिषद मलकापूर यांनी पुढील कार्यवाही करावी.

**विषय क्र ३:- तहसिल चौकात भारतीय घटनेचे शिल्पकार व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रवेश द्वाराची निर्मिती आणि रेल्वे स्टेशन समोर जुना नाका येथे ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजय स्तंभाची प्रतिकृती निर्मितीबाबत ना हरकत ठराव देणे.**

मलकापूर शहराच्या मध्ये तहसिल चौकात भारतीय घटनेचे शिल्पकार व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रवेश द्वाराची निर्मिती आणि रेल्वे स्टेशन समोर जुना नाका येथे ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजय स्तंभाची प्रतिकृती निर्मितीबाबत ना हरकत ठराव देणेकरिता आजच्या सभेत सविस्तर विचार विनिमय करण्यात आला.

श्री.अशोक नथ्थूजी सुरडकर, रा.एकता नगर,मलकापूर यांनी रेल्वे स्टेशन जवळच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असुन रेल्वे स्टेशनवर जाण्यासाठी जिल्ह्यातून गावोगावातून दररोज हजारो प्रवाशी मलकापूर शहरात येतात. तहसिल चौकात आल्यानंतर त्यांना रेल्वेस्टेशनवर जाण्याचा मार्ग ही समजत नाही. त्यामुळे तहसिल चौकात समोर असलेल्या रस्त्याच्या दुतर्फा बाजुला डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेश द्वाराची निर्मिती करावी. तव्दतच शौर्याचे प्रतिक असलेल्या पुणे जिल्ह्यातील ऐतिहासिक भिमा कोरेगांव मध्ये निर्मित विजय स्तंभाची प्रतिकृती निर्माण करावी जेणेकरून महानगरी, जिल्ह्यातील, शहरातील, ग्रामीण भागातील सर्व भिमसैनिकांनी अभिवादन करण्याची संधी मिळेल तसेच मलकापूर शहराच्या सौंदर्यात भर पडेल असा विनंती अर्ज केला आहे.

सदर जागा सार्वजनिक बांधकाम विभागाची असल्याने सदर प्रस्ताव हा न.प. चा ना हरकत ठराव घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागास पुढील कार्यवाही करणे करिता पाठवावा लागेल.

त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागास पुढील कार्यवाही करणेकरिता ही सभा ना हरकत ठराव मंजुर करीत आहे.

उपरोक्त ठरावाचे अनुषंगाने मुख्याधिकारी यांनी पुढील प्रशासनिक कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**विषय क्र ४:- श्री डी.एस. राठोड यांना मुख्याध्यापक / प्राचार्य या पदाचा पूर्णवेळ कार्यभार मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून मुख्याध्यापक मुनिसिपल हायर सेकंडरी स्कूल व ज्युनिअर कॉलेज मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार नगरपरिषद मलकापूर अधिनस्त असलेल्या म्युनिसिपल हायर सेकंडरी स्कूल येथील कार्यरत मुख्याध्यापक श्री के.जी. साखरे हे नियत वयोमानानुसार त्यांच्या सेवेतून दिनांक ३१/०८/२०२३ रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्या सदर रिक्त पदावर संस्थेतील सेवा जेष्ठता यादीनुसार सेवाजेष्ठ कर्मचारी श्री डी. एस. राठोड यांना आपल्या कार्यालयाचे आदेश क्र.मनप/मुअ/२५३९/३१/०८/२०२३ नुसार त्यांना मुख्याध्यापक / प्राचार्य या पदावर तात्पुरत्या स्वरूपाचे नियुक्ती देण्यात आलेली असून त्या नियुक्ती आदेशास मा. शिक्षणाधिकारी (माध्य)

जि.प. बुलढाणा यांचे कार्यालयाचे पत्र क्र.बुजिप/शिक्षक-४ब/४४५७/२०२३ दि १२/०९/२०२३ नुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली असल्याचे नमूद केले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता ठरविण्यात येते की, श्री डी. एस. राठोड यांना दिनांक ०१/०९/२०२३ पासून मुख्याध्यापक प्राचार्य या पदाचा पूर्ण वेळ पदभार देण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र ५:- न.प. मलकापूर द्वारा संचालित म्युनिसिपल हायर सेकंडरी स्कूल मलकापूर मधील श्री के.जी. साखरे यांच्या अर्जित रजा रोखीकरण करिता मंजुरी मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून मुख्याध्यापक मुनिसिपल हायर सेकंडरी स्कूल व ज्युनिअर कॉलेज मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार नगरपरिषद मलकापूर द्वारा संचालित म्युनिसिपल हायर सेकंडरी स्कूल येथे कार्यरत मुख्याध्यापक श्री के.जी. साखरे हे नियत वयोमानानुसार त्यांच्या सेवेतून दिनांक ३१/०८/२०२३ रोजी सेवानिवृत्त झाले असून दि १८/०३/२०२० ते ३१/०८/२०२३ पर्यंत मुख्याध्यापक या पदावर सेवेत असल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांचे १८/०३/२०२० ते ३१/०८/२०२३ पर्यंत त्यांचे एकूण अर्जित रजा ५३ दिवस शिल्लक असून शासनाचे अधीन राहून अर्जित रजेचे रोखीकरण करिता अर्ज न.प. ला सादर केला आहे

वरील सर्व बाबींचा विचार करता ठरविण्यात येते की, सेवा निवृत्त मुख्याध्यापक श्री के.जी. साखरे म्युनिसिपल हायर सेकंडरी स्कूल मलकापूर यांच्या शिल्लक अर्जित रजा रोखीकरण करण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे.

**आर.यु. सुरडकर**
**प्रशासक**
**नगर परिषद मलकापूर.**